**<u>महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांच्या आस्थापनेवरील महाव्यवस्थापक (प्रशासन) हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत मागणीपत्र.</u>**

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग,**

**शासन परिपत्रक क्रमांक: संकिर्ण १६१९/प्र.क्र. ३३७/१७-अे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

५ वा मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२

दिनांक : ११ डिसेंबर, २०१९

**<u>वाचा:</u> शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.:एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२ दि.१७/१२/२०१६.**

कृषि व पदुम विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांच्या आस्थापनेवरील महाव्यवस्थापक (प्रशासन) हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी, खालील तक्त्यात नमुद पात्रता आणि संवर्गानुसार शासकीय अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **पदाचे नांव** | महाव्यवस्थापक (प्रशासन) |
| **पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या** | मुख्य कार्यालय, महाबीज, अकोला. (पद-०१) |
| **वेतनश्रेणी** | पीबी-४ रु.३७४००-६७००० ग्रेडवेतन रु.८७००/-<br>• प्रतिनियुक्तीवरील उपजिल्हाधिकारी गट- अ संवर्गातील अधिकाऱ्याचे त्या पदावरील सध्याचे वेतन संरक्षित करण्यात येईल व इतर सोयी / सुविधा महाबीज सेवानियमामधील महाव्यवस्थापक (प्रशासन) यांचे वेतनश्रेणी व ग्रेडवेतन नुसार अनुज्ञेय राहतील. (उदा. घरभाडे, वाहन, प्रवास भत्ता, मोबाईल, वर्तमानपत्रे इत्यादि)<br>• सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक स्वीयसे/ २०१०/ प्र.क्र. ६७/ १०/ सेवा-६, दि. ०८/०४/२०१३ नुसार सुधारीत दराने प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय राहील. |
| **पात्रता** | महसूल व वन विभागांतर्गत उपजिल्हाधिकारी संवर्गातून प्रतिनियुक्ती अपेक्षित आहे.<br>वय मर्यादा- जास्तीत जास्त ५० वर्षे इतकी आहे. |
| **ज्या संवर्गामधून भरावयाचे आहे त्या संवर्गाचे नाव** | महसूल व वन विभागांतर्गत उपजिल्हाधिकारी संवर्गातून. |

२. प्रतिनियुक्तीचा कालावधी प्रथमत: ०१ वर्षाचा राहील. त्यानंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्यांच्या संमतीने हा कालावधी जास्तीत जास्त ०३ ते ०५ वर्षांपर्यंत वाढविता येईल.

३. महसूल व वन विभागास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी यांनी, त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात (परिशिष्ट-ड प्रमाणे) भरुन असे परिपूर्ण अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे/महाबीज महामंडळाच्या संकेतस्थळावर जाहिरातीच्या दिनांकापासून ०३ आठवड्यात (दिनांक ११.१२.२०१९ ते ०१.०१.२०२० पर्यंत) पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

५. प्रशासकीय विभागांनी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांच्या आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी यांच्या मागील ०५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतींसह या विभागाकडे/महाबीज, अकोला यांच्याकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ११.१२.२०१९ ते ०१.०१.२०२० पर्यंत पाठवावेत. विहीत मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

Prakash Rawoo Kadam

Digitally signed by Prakash Rawoo Kadam
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=944e446a6b36b86a52f12def26aa74e1d37e67433a0ce27e6a2caf774b9795c6, cn=Prakash Rawoo Kadam
Date: 2019.12.11 16:55:58 +05'30'

**(प्रकाश रा. कदम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

त्यांना विनंती की, सदरहू मागणीपत्र आपल्या अधिपत्याखालील कार्यालयप्रमुख/ विभागप्रमुखांच्या तातडीने निदर्शनास आणण्यात यावे.

२) उप सचिव (कार्यासन १२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित-**

१) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

यांना विनंती की, प्रस्तुत मागणीपत्र मंत्रालयीन इंट्रानेटवरील संदेश फलकावर आणि राज्य शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

परिशिष्ट-ड

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपुर्ण नांव | |
| २ | ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नांव | |
| ३ | अ)सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण | |
| | ब)वेतनश्रेणी | |
| ४ | सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग व नियंत्रण विभाग | |
| ५ | जन्म दिनांक | |
| ६ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय (वर्ष व महिने) | |
| ७ | मागासवर्गीय प्रवर्गात येत असल्यास प्रवर्ग | |
| ८ | सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पुरते आहे नियमित असल्यास नियमित दिनांक | |
| ९ | अधिकाऱ्याने घोषीत केलेला संपुर्ण पत्ता-स्वग्राम, तालुका, जिल्हा व पिन कोड | |
| १० | शैक्षणिक अर्हता | |
| ११ | अनुभव (धारण केलेले पद व कालावधी) | १. |
| | | २. |
| | | ३. |
| | | ४. |
| | | ५. |
| १२ | संपर्क क्र. | |
| | E-Mail ID | |

दिनांक / /२०१९

सही-------------------------

अर्जदाराचे नांव------------------------------